# ‘लवचीकता अर्थव्यवस्था टिकून राहण्याची गुरुकिल्ली’

## संजीव सन्याल यांची ‘आयआयएम’ला भेट

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**



**नागपूर :** लोकसंख्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी चीनने एक मुलगा ठेवण्याचे धोरण आणले होते. यामुळे त्यांच्या लोकसंख्येमध्ये ५० टक्क्यांनी घट झाली. ही आपल्याला खूप मोठी गोष्ट वाटत असली तरी चीनचे हे धोरण चुकीचे होते. याचा विपरीत परिणाम हा त्यांच्या अनेक संस्थांवर पडला. त्यामुळे अशा कठीण काळात देशासाठी धोरण ठरवताना लवचीकता आणि मूल्यांकनाची क्षमता महत्त्वाची आहे. अर्थव्यवस्था टिकून राहण्याची ती गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे सदस्य संजीव सन्याल यांनी केले. भारतीय व्यवस्थापन संस्था नागपूर येथे पदव्युत्तर व्यवस्थापन शास्त्राच्या विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते बोलत होते.

अनिश्चित काळात धोरण तयार करणे किती कठीण असते यावर माहिती देताना सन्याल म्हणाले, आजचे जग अनिश्चित आहे. खरे तर जगासमोर नेहमीच अनेक संकट राहत असल्याने ते अनिश्चितच असते. जगासह भारतासाठीही करोना काळ कठीण होता. पहिल्यांदाच आलेल्या अशा साथ रोगाचा सामना कसा करावा हे आव्हान होते. पुढे काय करावे, कुठली धोरणे ठरवावी हे कुणालाही माहिती नव्हते. त्यामुळेच टाळेबंदी लावण्यात आली. या काळात समोरची धोरणे ठरवण्यात आली. टाळेबंदीच्या काळात लोकांकडूनही विविध प्रकारची माहिती गोळा करण्यात आली. त्यामुळे व्यवस्थापन शास्त्राच्या विद्यार्थ्यांनी अर्थविषयक धोरणे ठरवताना काळजी घेणे आवश्यक आहे. लवचीकता ही अर्थव्यवस्था टिकून राहण्याची गुरुकिल्ली आहे असेही सन्याल म्हणाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी सन्याल यांचे स्वागत केले.

लोकसत्ता Tue, 14 March 2023
https://epaper.loksatta.com/c/71911807